# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १८७ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि. ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी २.३० वा.

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १८७ वी (तातडीची) बैठक **गुरुवार, दि.१० ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी ०२.३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे प्रत्यक्ष व Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे ऑनलाईन अशा दोन्ही पध्दतीने मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. तथापि, भारताचे थोर उद्योगपती, पद्मभूषण व पद्मविभूषण या सर्वोच्च नागरी पुरस्काराचे मानकरी मा. रतनजी टाटा यांचे दि.०९/१०/२०२४ रोजी दुख:द निधन झाल्याने दि.१०/१०/२०२४ रोजीची बैठक तहकूब करण्यात आली.

त्यानुसार दि.१० ऑक्टोबर, २०२४ रोजीची तहकूब केलेली बैठक **शुक्रवार, दि. ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी ०२:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे प्रत्यक्ष व Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे ऑनलाईन अशा दोन्ही पध्दतीने मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस प्रत्यक्ष व ऑनलाईन पध्दतीने उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १८) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

स्वागत:

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

अनुपस्थिती:

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. वसंत गुरुशांत कोरे व डॉ. अजित माधव पाटणकर यांनी आपली अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दि. ०५ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८६ (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि. ०५ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८६ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र.१३(५) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | आस्थापना विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | विद्यापीठातील नियमित पदावर कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांच्या कामाचा आढावा (Work Audit) करण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली. | |

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | अध्यक्ष |
| २. | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य |
| ३. | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य |
| ४. | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य |
| ५. | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य |
| ६. | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य सचिव |

दुरुस्त केलेला ठराव

विद्यापीठातील नियमित पदावर कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांच्या कामाचा आढावा (Work Audit) करण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | अध्यक्ष |
| २. | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य |
| ३. | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य |
| ४. | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य |
| ५. | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य |
| ६. | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य |
| ७. | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य सचिव |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदवी भाग २ व ३ या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याबाबत दि.२८/०८/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठरावाची दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत झालेल्या दुरुस्ती ठरावाच्या अनुरोधाने डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य, या गठित समितीचा अहवाल विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर केला असता, त्यास विद्यापरिषदेने सर्वानुमते मान्यता दिली आहे. सदर प्रकरणी तातडीची कार्यवाही करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाकडून मागील शैक्षणिक वर्षी (२०२२-२३ व २०२३-२४) अनुक्रमे भाग १ व २ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा जादा वाढीव विद्यार्थी संख्येस प्रवेश देण्याबाबत मान्यता देण्यात आलेली असून त्याच्या परिणाम स्वरुपी व उदा. माऊली महाविद्यालय, वडाळा येथील महाविद्यालयात बी.ए. प्रथम वर्षाकरीता मूळ प्रवेश क्षमता १२० व अतिरिक्ततुकडी ०१ ची प्रवेश क्षमता १२० अशी एकुण प्रवेश क्षमता २४० आहे. तर बी.ए. भाग ०२ करिता मूळ प्रवेश क्षमता १२० आहे आणि बी.ए. भाग ०३ करिता देखील १२० आहे. यास्तव विद्यापीठाकडून मंजूर करण्यात आलेली वाढीव विद्यार्थी प्रवेश संख्या व बी.ए. भाग ०१ च्या परिणाम स्वरुपीची नैसर्गिक वाढ याबाबीच्या अनुरोधाने संलग्नित महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी भाग ०२ व ०३ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थी संख्येस प्रवेश देण्यास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झाले होते.<br>त्याअनुषंगाने दि. २२/०७/२०२४ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर मा. प्र-कुलगुरु महोदयांनी पुढीलप्रमाणे पृष्ठांकन केलेले आहे. "स्वतंत्र समिती महाविद्यालयास पाठवून तेथील सेवा सुविधा व नियमाप्रमाणे सर्व गोष्टी तपासून घेणेकरिता व समिती पाठविणेकरिता मान्यतेस्तव सादर. सदर कमिटीचे T.A. नियमाप्रमाणे महाविद्यालयांकडून सदस्यांना देण्यास मान्यतेस्तव सादर." तर मा. कुलगुरु महोदयांनी पुढीलप्रमाणे पृष्ठांकन केलेले आहे. "१) Not approved as per AC resolution but LIC can be sent. २) १०% increase is approved." व दि. ०५/०८/२०२४ रोजीच्या कार्यालयीन टिपणीवर मा. प्र-कुलगुरु महोदयांनी पुढीलप्रमाणे पृष्ठांकन केलेले आहे. " कमिटी पाठवूनच मान्यतेकरिता सादर करण्यास्तव मंजूरीस सादर. जिथे फक्त १०% वाढ मागितलेली आहे तेथे १०% वाढ देण्यास मंजूरी करिता सादर." तर मा. कुलगुरु महोदयांनी त्यास मान्यता दिलेली आहे. मा. प्र-कुलगुरु व मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार संबंधित महाविद्यालयास मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा जादा वाढीव विद्यार्थी संख्या मान्यतेबाबतचे पत्र पाठविण्यात आलेले आहे. तर आदेशानुसार उर्वरित प्रशासकिय कामकाजाकरिता संबंधित महाविद्यालयास स्थानिक चौकशी समिती पाठविणे कामी नामनिर्देशनास्तव दि. २०/०८/२०२४ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. सदर कार्यालयीन टिपणीवर मा. प्र-कुलगुरु महोदयांनी ब प्रमाणे मान्यतेस्तव सादर तर मा.कुलगुरु महोदयांनी प्र-कुलगुरु महोदय यांच्याशी चर्चेअंती Please place before upcoming Acdemic Counicl असे पृष्ठांकन करुन आदेशित केलेने सदरचे प्रकरण दि.२८/०८/२०२४ रोजीच्या विद्यापीठ अधिकार मंडळाच्या (विद्यापरिषदेच्या) बैठकीसमोर सादर केले असता, त्यावर ठराव क्र.०५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. | संलग्नता विभाग |

" शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदवी भाग २ व ३ याअभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याबाबत खालीलप्रमाणे अटींच्या राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

१. ज्या महाविद्यालयांना १०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्येची मागणी केली आहे, अशा महाविद्यालयांना यापूर्वी डॉ. तानाजी कोळेकर, विद्या परिषदसदस्य यांच्या अध्यक्षेतेखाली नियुक्त केलेल्या ५ सदस्यीय समितीने भेटी द्याव्यात. सदर समितीचा प्रवास व दैनिकभत्ता याचा खर्च संबंधीत महाविद्यालयांनी अदा करावा.
२. १०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्येची मागणी केलेल्या महाविद्यालयांनी सर्व सोयी सुविधांची पूर्तता केली आहे का नाही याबाबत सदर समितीने खात्री करावी.
३. येथून पुढे १०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्याकोणत्याही महाविद्यालयास देण्यास येऊ नये.
४. १०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्यामागितलेल्या महाविद्यालयाकडून प्रती विद्यार्थी रु. १,०००/- याप्रमाणे दंड आकारण्यात यावा.
५. महाविद्यालयाकडून अटींची पूर्तता होत नाही तो पर्यंत सदर समिती महाविद्यालयांस भेट देईल.
६. वाढीव विद्यार्थी संख्येसंदर्भात या महाविद्यालया व्यतिरिक्त इतर महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यांना या ठरावानुसार कार्यवाही करुन मान्यता देण्यात यावी.
७. दरम्यानच्या कालावधीत प्रशासकिय कार्यवाही सुरु असताना संदर्भ क्र. ०२ अन्वये दि. ०३/०९/२०२४ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत ठराव क्र. ०१ अन्वये दुरुस्त केलेला ठराव खालीलप्रमाणे आहे.

"शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदवी भाग २ व ३ या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याबाबत खालीलप्रमाणे अटींच्या राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

१. ज्या महाविद्यालयांना ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्येची मागणी केली आहे, अशा महाविद्यालयांना यापूर्वी डॉ. तानाजी कोळेकर, विद्या परिषद सदस्य यांच्या अध्यक्षेतेखाली नियुक्त केलेल्या ५ सदस्यीय समितीने भेटी द्याव्यात. सदर समितीचा प्रवास व दैनिकभत्ता याचा खर्च संबंधीत महाविद्यालयांनी अदा करावा.
२. ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्येची मागणी केलेल्या महाविद्यालयांनी सर्व सोयी सुविधांची पूर्तता केली आहे का नाही याबाबत सदर समितीने खात्री करावी.
३. ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्यामागितलेल्या महाविद्यालयांकडून प्रती विद्यार्थी रु. १०००/- याप्रमाणे दंड आकरण्यात यावा.
४. खालील तक्त्यातील महाविद्यालयांना ४०% पर्यंतच वाढीव विद्यार्थी संख्या देण्यात यावी.
५. महाविद्यालयांकडून अटींची पूर्तता होत नाही तोपर्यंत सदर समिती महाविद्यालयांस भेट देत राहील.
६. वाढीव विद्यार्थी संख्येसंदर्भात या महाविद्यालयां व्यतिरिक्त इतर महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यांना या ठरावानुसार कार्यवाही करुन मान्यता देण्यात यावी.
७. येथून पुढे प्रथम वर्षापासून १०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्या कोणत्याही महाविद्यालयास देण्यात येऊ नये. तथापि, खालील तक्त्यात नमूद ज्या महाविद्यालयांना ४०% पर्यंत जास्त वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्यात आली आहे. त्या महाविद्यालयांना सदर अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत सदर वाढ मान्य राहील.

उपरोक्त ठरावामधील मुद्दा क्र. १, २ व ३ च्या अनुरोधाने डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य समितीचा खालील तक्त्यात नमूद केलेल्या महाविद्यालयांचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | मूळ प्रवेश क्षमता | मागणी केलेली टक्केवारी | वाढीव विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अॅन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर, अकलुज | बी.एस्सी. (ई.सी.एस.) भाग २ | ८० | ११०% | ८८ |
| | | बी.एस्सी. (ई.सी.एस.) भाग ३ | ८० | ८०% | ६४ |
| | | बी.सी.ए. भाग २ | ६० | १००% | ६० |
| | | बी.सी.ए. भाग ३ | ६० | ५०% | ३० |
| २. | सांगोला महाविद्यालय, सांगोला. | बी.सी.ए. भाग ३ | ६० | ६०% | ३६ |
| ३. | सांगोला महाविद्यालय, सांगोला. | बी.एस्सी. (ई.सी.एस.) भाग ३ | ८० | ७०% | ५६ |
| ४. | बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी. | बी.सी.ए. भाग ३ | ६० | ११०% | ६६ |
| ५. | देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ. | बी.सी.ए. भाग ३ | ६० | ७०% | ४२ |
| ६. | सांगोला महाविद्यालय, सांगोला. | बी.सी.ए. भाग ३ | ६० | ६०% | ३६ |

विद्यापरिषदेने नियुक्त केलेल्या समितीने उपरोक्त महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी वाढीव विद्यार्थी संख्या देण्याची शिफारस केलेली आहे. उक्त ठरावातील मुद्दा क्र. २ नुसार समितीने खात्री करुन विद्यापीठास अहवाल सादर केला आहे. सदरील अहवाल सोबत जोडला आहे. तर मुद्दा क्र. ३ नुसार ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्या मागितलेल्या महाविद्यालयांकडून प्रती विद्यार्थी रु. १०००/- याप्रमाणे दंड आकारावा लागणार आहे. त्याचप्रमाणे दरम्यानच्या कालावधीत शासनाच्या धोरणानुसार १८% प्रमाणे GST शुल्काची रक्कम आकारावी लागणार आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदवी भाग २ व ३ या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याबाबत दि.२८/०८/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठरावाची दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत झालेल्या दुरुस्ती ठरावाच्या अनुरोधाने डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य, या गठित समितीचा अहवाल विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर केला असता त्यास विद्यापरिषदेने सर्वानुमते मान्यता दिली आहे. सदर प्रकरणी तातडीची कार्यवाही करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

ठराव: **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदवी भाग २ व ३ या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याबाबत दि.२८/०८/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठरावाची दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत झालेल्या दुरुस्ती ठरावाच्या अनुरोधाने डॉ. तानाजी कोळेकर, विद्यापरिषद सदस्य, या गठित समितीचा अहवाल विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर केला असता, त्यास विद्यापरिषदेने सर्वानुमते मान्यता दिली आहे. सदर प्रकरणी तातडीची कार्यवाही करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.**

**तथापि, सदर प्रकरणातील महाविद्यालयांना आकारण्यात आलेल्या दंडाची बाब रद्द करण्यात यावी व यापुढे १०% पेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्यात येवू नये असे सर्वानुमते ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०३] | **कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर आणि कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या दोन्ही महाविद्यालयांच्या नावात बदलास शासन मान्यतेच्या अधीन राहून मान्यता देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: वाचा : १) मा. प्राचार्य, कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर यांचे पत्र क्र. COPP/२०२४-२५/३३, दिनांक ११/०६/२०२४<br>२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ०६/०७/MS/PHARM/२००५/०७५, दिनांक ३०/०५/२००६.<br>३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई शासन निर्णय क्र. पीईसी २००६/(२८९/०६)तांशि-५, दिनांक १४/०६/२००६.<br>४) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मान्यता/२००६/६, दिनांक २१/०७/२००६ रोजीचे पत्र.<br>५) विद्यापीठ पत्र क्र. SOL/UTY/Affi/४३०/११६९, दिनांक २७/०६/२००७.<br>६) विद्यापीठ पत्र क्र. SOL/UTY/Affi/१०१९/५२३५, दिनांक १४/०८/२००८.<br>७) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांचे पत्र क्र. ०६/०७/MS/PHARM/२००५/०७५, दिनांक २९/०५/२००९.<br>८) विद्यापीठ पत्र क्र. SOL/UTY/BCUD/Affi/१०८६/४०८७, दिनांक ०८/१०/२००९.<br>९) मा. प्राचार्य, कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर यांचे पत्र क्र. COPP/२०२३-२४/६०, दिनांक २४/०७/२०२३.<br>१०) दिनांक २६/०७/२०२३ रोजीची प्रशासकीय मान्य टिपणी<br>११) दिनांक १९/०८/२०२३ रोजीची प्रशासकीय मान्य टिपणी.<br>१२) व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १५/०९/२०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. २१<br>१३) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२३-२४/४७४९, दिनांक २७/०७/२०२३.<br>१४) दिनांक १९/०६/२०२४ रोजीची प्रशासकीय मान्य टिपणी.<br>१५) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/५०५१, दिनांक १२/०७/२०२४.<br>१६) मा. प्राचार्य, कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर यांचे पत्र क्र. COPP/२०२४-२५/६०, दिनांक २४/०७/२०२४.<br>१७) मा. प्राचार्य, कॉलेज ऑफ इंजिनिअरंग, पंढरपूर यांचे पत्र क्र. COEPR/२०२४-२०२५/३५२, दिनांक २३/०७/२०२४.<br>संदर्भ क्र. १ अन्वये कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी Govt. GR, DTE, AICTE, PCI यांचे मान्यता पत्रामध्ये Shri Vithal Education & Research Institute's College of Pharmacy, Pandharpur असे देण्यात आलेले आहे. परंतू प्रस्तुत विद्यापीठाकडून प्राप्त होणाऱ्या पत्रांमध्ये महाविद्यालयाचे नाव College of Pharmacy, Pandharpur असे आहे. त्यानुसार महाविद्यालयाच्या नावामध्ये Shri Vithal Education & Research Institute's College of Pharmacy, Pandharpur अशी दुरुस्ती करुन भविष्यातील पत्रव्यवहार करणेबाबत कळविले आहे.<br>याबाबत सादर करण्यात येते की, | संलग्नता विभाग |

| अ. क्र. | संदर्भ क्र. | संबंधीत शिखर संस्था/ महाराष्ट्र शासन / महाविद्यालयाचे नाव | महाविद्यालयाचे नाव | |
|---|---|---|---|---|
| १) | संदर्भ क्र. १ | कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर | उक्त पत्रान्वये उक्त महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयाचे नाव Shri Vithal Education & Research Institute's College of Pharmacy, Pandharpur असे दुरुस्त करुन मिळणेबाबत विनंती केली आहे. | |
| २) | संदर्भ क्र. २ | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली | College of Pharmacy, Pandharpur (महाविद्यालय प्रथम मान्यता) | |
| ३) | संदर्भ क्र. ३ | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई | श्री विठ्ठल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टि., गोपाळपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांचे कॉलेज ऑफ फार्मसी, पो.बॉ.नं. ५४, गोपाळपूर, ता. पंढरपूर ४१३३०४ (शासन निर्णयामध्ये प्रस्तावित महाविद्यालयांना संस्थेच्या व महाविद्यालयाच्या नावासहित शासन मान्यता देण्यात येते.) | |
| ४) | संदर्भ क्र. ४ | तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | विठ्ठल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयुटचे कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर, गोपापूर-रांजणी रोड, पो.बॉ.नं.५४, ता. पंढरपूर ४१३ ३०४, जि. सोलापूर | |
| ५) | संदर्भ क्र. ५ | विद्यापीठ प्रथम संलग्निकरण मान्यता पत्र (बी. फार्मसी भाग १) | कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर | |
| ६) | संदर्भ क्र. ६ | विद्यापीठाचे संलग्निकरणाच्या विस्ताराचे मान्यता पत्र (बी. फार्मसी भाग २) | कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर | |
| ७) | संदर्भ क्र. ७ | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद | College of Pharmacy, P.B.No.५४, Gopalpur, Pandharpur-४१३ ३०४ | |
| ८) | संदर्भ क्र. ८ | विद्यापीठाचे बी. फार्मसी भाग १ व २ चे संलग्निकरणाचे नुतनीकरण आणि भाग ३ च्या विस्ताराचे मान्यता पत्र | श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयुट, पंढरपूरचे, कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर (संबंधित संस्थेचे संचलित अशी मान्यता देण्यात आली.) | |
| ९) | संदर्भ क्र. ९ | कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर | उक्त पत्रान्वये उक्त महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयाचे नाव SVERI's College of Pharmacy, Pandharpur असे दुरुस्त करुन मिळणेबाबत विनंती केली होती. | |

संदर्भ क्र. ९ अन्वये उक्त महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी उक्त महाविद्यालय सुरु करणेबाबत शासनाकडून मिळालेली मान्यता (शासन निर्णय दिनांक १४/०६/२००६) ची प्रत तसेच विद्यापीठाकडून मिळालेले संलग्निकरणाचे मान्यता पत्र जोडून महाविद्यालयाचे नाव SVERI's College of Pharmacy, Pandharpur असे दुरुस्त करुन मिळणेबाबत विनंती केली होती. त्यानुसार दिनांक २६/०७/२०२३ आणि दिनांक १९/०८/२०२३ रोजीच्या (संदर्भ क्र. १० आणि संदर्भ क्र. ११) टिपणीवरील प्राप्त आदेशानुसार, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाच्या नावातील अंशत: दुरुस्तीस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने शासनास प्रस्ताव सादर करणेकामी मान्यता दिलेली बाब माहितीस्तव तसेच महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबत विद्यापीठ नियमानुसार प्रथम नावात बदल करण्यासाठी रु. २५,०००/- तर दुसऱ्यांदा नावात बदल करण्यासाठी रु. ५०,०००/- व अर्ज शुल्क रु. ५००/- इतके आकारले जाते सदरची बाब दिनांक १५/०९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर करण्यात आली होती.

त्यानुषंगाने दिनांक १५/०९/२०२३ रोजीच्या (संदर्भ क्र. १२) व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र. २१ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाच्या नावातील अंशत: दुरुस्तीत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने शासनास प्रस्ताव सादर करणेकामी दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली."

तद्नंतर संदर्भ क्र. १३ अन्वये मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग (मशि-४), मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना खालील महाविद्यालयाच्या नावातील अंशत: दुरुस्तीस त्या-त्या शिखर संस्थेनी ( एन.सी.टी.ई., ए.आय.सी.टी.ई. व विद्यापीठ अनुदान आयोग ) मान्यता दिली असल्याने त्या अनुरोधाने शासनाने (१) श्री. सुशिलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नेहरु नगर, सोलापूर, (२) कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर, (३) कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर, (४) कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर आणि (५) श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयांच्या नावातील अंशत: दुरुस्तीस मान्यता मिळणेबाबत कळविले आहे. परंतू, याबाबत अद्यापपर्यंत महाराष्ट्र शासनाकडून उपरोक्त महाविद्यालयांच्या नावातील दुरुस्तीबाबत मान्यता अप्राप्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

सदर प्रकरणी संदर्भ क्र. १ अन्वये कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी Govt. GR, DTE, AICTE, PCI यांचे मान्यता पत्रामध्ये Shri Vithal Education & Research Institute's College of Pharmacy, Pandharpur असे शासनास कळविण्यात आलेले आहे. परंतू प्रस्तुत विद्यापीठाकडून प्राप्त होणाऱ्या पत्रांमध्ये महाविद्यालयाचे नाव College of Pharmacy, Pandharpur असे आहे. त्यानुसार महाविद्यालयाच्या नावामध्ये Shri Vithal Education & Research Institute's College of Pharmacy, Pandharpur अशी दुरुस्ती करुन भविष्यातील पत्रव्यवहार करणेबाबत कळविले आहे.

| | | |
|---|---|---|
| | उपरोक्त पार्श्वभूमी अवलोकनी घेता असे दिसून येते की, संदर्भ क्र. २ ते ८ अन्वये महाविद्यालयाच्या स्थापनेपासून उक्त महाविद्यालयाचे नाव कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर असे आहे. तसेच उक्त महाविद्यालयाकडून नावात बदलाबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास अद्यापपर्यंत अप्राप्त आहे. संदर्भ क्र. १ आणि संदर्भ क्र. ९ अन्वये उक्त महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयाच्या नावात दुरुस्ती करण्याकरिता दोन वेळा वेगवेगळे महाविद्यालयाचे नाव नमूद करुन विद्यापीठ प्रशासनास कळविले आहे असे सोबतच्या अभिलेखावरुन दिसून येते. याबाबत महाविद्यालयाच्या नावात करावयाच्या दुरुस्तीबाबत संदिग्धता निर्माण झालेली आहे.<br>त्यानुसार दिनांक १९/०६/२०२४ ( संदर्भ क्र. १४ ) रोजी सादर केलेल्या टिपणीवरील प्राप्त आदेशानुसार संदर्भ क्र. १५ अन्वये (१) श्री. सुशिलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नेहरु नगर, सोलापूर, (२) कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर, (३) कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर, (४) कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर आणि (५) श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयांना नावात बदलाबाबतचे प्रस्ताव शुल्क भरणा करणेबाबत कळविले होते. त्यानुषंगाने संदर्भ क्र. १६ कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर यांनी महाविद्यालयाच्या नावात बदलाबाबतचे प्रस्ताव शुल्क रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार पाचशे फक्त) आणि संदर्भ क्र. १७ अन्वये कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर यांनी महाविद्यालयाच्या नावात बदलाबाबतचे प्रस्ताव शुल्क रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार पाचशे फक्त) या दोन्ही महाविद्यालयांनी भरणा केलेले आहेत. | |

| अ. क्र. | सद्यस्थितीत महाविद्यालयाचे नाव | दुरुस्तीसह महाविद्यालयाचे नाव |
|---|---|---|
| १) | कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर | स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर |
| २) | कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर | श्री विठ्ठल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युटज कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर |

सबब, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर आणि कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या दोन्ही महाविद्यालयांच्या नावात बदलास शासन मान्यतेच्या अधीन राहून मान्यता देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव:** **कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर आणि कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या दोन्ही महाविद्यालयांच्या नावात बदलास शासन मान्यतेच्या अधीन राहून खालीलप्रमाणे सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ. क्र. | सद्यस्थितीत महाविद्यालयाचे नाव | दुरुस्तीसह महाविद्यालयाचे नाव |
|---|---|---|
| **१)** | **कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर** | **स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर** |
| **२)** | **कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर** | **श्री विठ्ठल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट्स कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर** |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०४ ] | **Botanical Survey of India (BSI) Kolkata आणि School of Life Science यांचेशी MoU करुन घेण्यासाठी सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: BSI ही भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या अंतर्गत सवेक्षण, दस्ताऐवजीकरण आणि संवर्धनाव्दारे देशातील वन्य वनस्पती संसाधानांवर वर्गीकरण/फलोरिस्टिक अभ्यास करणारी सर्वोच्च संशोधन संस्था आहे. Botanical Survey of India (BSI) Kolkata यांचेकडून School of Life Science या संकुलाशी MoU केल्यास देशातील विविध भौगोलिक प्रदेशांचे गहन करणे, फलोरिस्टिक सर्वेक्षण करणे, देशातील वनस्पतीची घटना, वितरण, पर्यावरणशास्त्र आणि आर्थिक उपयुक्तता याबद्दल तपशीलवार माहिती गोळा करणे, स्थानिक जिल्हा राज्य आणि राष्ट्रीय वनस्पतीच्या स्वरुपात वनस्पती संसाधनांचे दस्तऐवजीकरण करणे तसेच स्थानिक , दुर्मिळ आणि धोक्यात असलेल्या वनस्पती प्रजातीची यादी तयार करुन सवंर्धन धोरण विकसित करणे व नाजूक परिसंस्थेचा अभ्यास आणि अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने आणि बायोस्फीटर रिझर्व्ह यांसारख्या संरक्षित क्षेत्राचा अभ्यास करणे हा उद्देश आहे. त्यामुळे त्यांचा फायदा विद्यापीठास व संकुलातील विद्यार्थ्यांना होणार आहे.<br>सबब, School of Life Science आणि Botanical Survey of India (BSI) Kolkata या संस्थेशी MoU करण्यासाठी सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | जैवविज्ञान संकुल |
| **ठराव:** | **Botanical Survey of India (BSI) Kolkata आणि School of Life Science या संस्थेशी MoU करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **दि.१०/१०/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.३०/०९/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: दि.३०/०९/२०२४ रोजी झालेल्या खरेदी समिती बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statute No.S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीची व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.१०/१०/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.३०/०९/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **दि.१०/१०/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.३०/०९/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | दि.१०/१०/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.१०/१०/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: दि. १०/१०/२०२४ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या तातडीचा बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडला आहे. तो General Statute No. S. ३२४ नुसार वित्त व लेखा समितीची व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि. १०/१०/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि. १०/१०/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | दि.१०/१०/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.१०/१०/२०२४ रोजीच्या खरेदी समितीच्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक जाहिरात दैनिक लोकमत दिवाळी अंकात प्रसिध्द करण्याची बाब विचारार्थ सादर.<br><br>टिपणी: प्रतिवर्षी दिवाळी सणानिमित्त उच्च साहित्यमूल्य, विज्ञान, तंत्रज्ञान, वैचारिक लेख आणि मनोरंजनाची पर्वणी असलेला दैनिक लोकमतचा दिवाळी अंक प्रसिध्द करण्यात येतो. त्यानिमित्ताने प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक जाहिरात लाखो लोकांपर्यत पोचविण्याकरिता लोकमतच्या परिपूर्ण दिवाळी अंकात जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी दैनिक लोकमततर्फे खालीलप्रमाणे जीएसटीसह दरपत्रक सादर करण्यात आले आहे. | जनसंपर्क विभाग |

| अ.क्र. | साईज | कृष्णधवल | रंगीत |
|---|---|---|---|
| १) | पूर्ण पान (१६ x २३) | रु. २९,०००/- | रु. ४७,०००/- |
| २) | अर्धे पान (१६ x ११) | रु. १९,०००/- | रु. २८,०००/- |
| ३) | पाव पान (७.५ x ११) | रु. १२,०००/- | रु. १६,०००/- |
| ४) | १/६ पान (८ x ७.५) | रु. ७,०००/- | रु. १२,०००/- |
| ५) | ग्लेझ पूर्ण पान (१६ x २३) | ----- | रु. १,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | तरी प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक माहितीस व्यापक प्रसिध्दी मिळणेकामी लोकमतच्या दिवाळी अंकात प्रसिध्द करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक जाहिरात दैनिक लोकमत दिवाळी अंकात प्रसिध्द करण्याची बाब सर्वानुमते अमान्य करण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०८ ] | **विद्यापीठाच्या परिसरातील कामासाठी १ नवीन ट्रॅक्टर वाहन खरेदी करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठाच्या केगाव परिसरात विविध इमारतींचे बांधकाम, अंतर्गत रस्ते व विविध विकास कामे करण्यात आली आहेत. मौजे कोंडी येथील ४८२ एकर परिसरात विविध इमारतीचे बांधकाम, खेलो इंडिया योजने अंतर्गत मल्टीपर्पज हॉल बांधणे, अंतर्गत रस्ते तयार करणे. पी. एम. उषा योजने अंतर्गत विविध इमारत बांधकाम करणे व विविध विकास कामे करावयाची आहेत. सदर परिसरामध्ये येण्याजाण्यासाठी रस्ता नसून तेथील उपलब्ध मूरुम, दगड माती इ. साहयाने रस्ता तयार करुन घ्यावा लागणार आहे. त्यामुळे विद्यापीठाकडून १ नवीन ट्रॅक्टर वाहनाची खरेदी केल्यास विविध कामे करण्यास उपयुक्त ठरणार आहे. तसेच हॅन्ड ऑपरेटेड पेट्रोलवर चालणारी ड्रील मशिन घेणे ही उपयुक्त ठरेल.<br>सबब, विद्यापीठाच्या परिसरातील कामासाठी १ नवीन ट्रॅक्टर व हॅन्ड ऑपरेटेड पेट्रोलवर चालणारी ड्रील मशिन खरेदी करण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **विद्यापीठाकडे सद्यस्थितीत परिसरातील व नवीन परिसरातील कामाकरिता JCB assembly व Hand Operating System सह एक नवीन ट्रॅक्टर खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(१)] | सोलापूर पुणे नॅशनल हायवे ते प्रस्तुत विद्यापीठाच्या मौजे कोंडी ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर येथील मुख्य प्रशासकीय इमारत येथे रस्ता तयार करण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी |
| ठराव: | सोलापूर पुणे नॅशनल हायवे ते प्रस्तुत विद्यापीठाच्या मौजे कोंडी ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर येथील ४८२ एकर येथील परिसरातील मुख्य प्रशासकीय इमारत येथे रस्ता तयार करण्यासाठी सोयी सुविधांचा विचार करणेसाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली. | विभाग |

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु | अध्यक्ष |
| २. | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य |
| ३. | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्य |
| ४. | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य |
| ५. | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद